**भारतीय नोंदणी अधिनियम १९०८**

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : नोंदणी-२००६/प्र.क्र.४१७/म-१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ८/११/२००६

**शासन निर्णय :-**

नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम २२अ मधील अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासनाने विशिष्ट दस्तांची नोंदणी जनहितविरोधी घोषित करुन त्यांचे नोंदणीस मज्जाव केला आहे. दरम्यानच्या काळात मा.सर्वोच्च न्यायालयाने सन २००१ चे दिवाणी दावा क्र.७८०० मध्ये निकाल देताना (राजस्थान राज्य विरुध्द वसंत नाहटा, (अेआयआर २००५, एस.सी.३४०१)) वरील कलम २२अ ची तरतूद घटनाबाहय ठरविली आहे. उक्त निकालाचे परिणामस्वरुप कलम २२अ प्रमाणे काढलेल्या अधिसूचना कायद्याने अवैध झालेल्या आहेत.

त्याअर्थी महाराष्ट्र शासन याद्वारे यापूर्वी नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम २२अ प्रमाणे काढलेल्या सर्व अधिसूचनांचा प्रभाव संपुष्टात आल्याचे जाहीर करीत आहे. यापुढे कोणत्याही नोंदणी अधिका-यास कलम २२अ मधील तरतुदींचे कारणास्तव कोणत्याही दस्ताची नोंदणी रोखून धरता येणार नाही. हे आदेश तात्काळ अंमलात येतील.

जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी
शाखा - TNC
आवक नं. -
20 NOV 2006
विशेष नोंद वही नं. -
कार्यविवरण नं. -

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

स्वा. य. सावंत
( स्वा. य. सावंत )
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग.

प्रति,